1sr

B-18

(1)

classmate
Date
Page

013090

निदेशक मुंबई जी.पी.ओ.
Director Mumbai GPO 400 001.
11 AUG 2017
प्राप्त/RECEIVED

कु. गोरे संजुश्री सुदेश,
'अनुग्रह', लक्ष्मी-नारायण
नगर, महालक्ष्मी मंदिर,
खेडशी, ता. जि. रत्नागिरी.
पि. कोड. 415 639..
दिनांक: 4 ऑगस्ट, 2017

प्रिय बापू,

शि. सा. न. वि. वि.

प्रिय बापू! तुमच्या या नावातच किती आपुलकी आहे! एक थोर नेता म्हणून तुम्ही जसे प्रसिध्द आहात, तसेच एक सामान्य प्रवृत्तीचा माणूस म्हणूनही सर्व समाजात तुम्ही आदर्श उदाहरण आहात. आजच्या या एकविसाव्या शतकात अनेक पुढारी, नेते, राजकारणी आहेत; पण बापू तुम्हीच माझे आवडते पुढारी आहात! याची कारणे सांगू तितकी कमीच आहेत!

आयुष्य जगत असताना आपल्याला अनेक माणसे भेटतात. प्रत्येक माणूस आपल्याला काही ना काही तरी शिकवत हा असतोच; पण त्यांतली काही माणसे असा संदेश वा उपदेश सांगून जातात की आपल्या आयुष्याला कलाटणी मिळते. माझ्या आयुष्यात आलेल्या किंवा अनुभवलेल्या अशा व्यक्तींपैकी, बापू, तुम्ही एक!

प्रथम मला भावलेला तुमचा गुण म्हणजे- 'सत्याग्रह व असहकार' या तत्त्वांचा शस्त्र म्हणून वापर! तुमची स्वातंत्र्य-प्राप्तीची ही अस्त्रे नवीन पिढीला मार्गदर्शक आहेत. या अस्त्रांचा वापर जर मागासलेल्या, सुविधांपासून वंचित राहिलेल्या समाजाने केला तर तेही विकासाच्या प्रवाहात आल्यावाचून राहणार नाहीत. या शस्त्रांच्या उपयोगामुळे हिंसेच्या मार्गाने होणारी हानी वाचू शकते.

यानंतरचा तुमचा गुण म्हणजे- 'खरेपणा.' जीवनातील सर्व चुकींची प्रांजळपणे कबुली तुम्ही तुमच्या 'सत्याच्या प्रयोगांत' दिलीत व सर्वांसाठीच एक उदाहरण निर्माण केलेत. तुमच्या या चरित्रातील मला आवडलेली गोष्ट म्हणजे तुम्ही सत्याचे पाठ न शिकवता प्रत्यक्ष सत्याचे प्रयोग मांडले आहेत!

लिहीता लिहीताच मला तुमचा 'हस्ताक्षरा'चा प्रसंग आठवतो. ज्यात तुम्ही अगदी मोकळेपणाने तुमची चूक सांगितली आहे. तो प्रसंग असा - लहानपणापासून 'शिक्षणात सुंदर हस्ताक्षर लागत नाही' असा तुमचा गैरसमज होता. जेव्हा तुम्ही आफ्रिकेतील वकिलांची व तेथील नवयुवकांची मोत्यासारखी अक्षरे पाहिली तेव्हा तुम्ही शरमला, पस्तावलात. तुम्ही अक्षर सुधारण्याचा खूप प्रयत्न केलात; पण ते साध्य होऊ शकले नाही!

हा प्रसंग वाचत असताना माझ्या मनात एक वाक्य कायमचे बसले ते म्हणजे - 'पक्क्या मडक्याचे काठ वळणार थोडेच?' या वाक्यावरुन मी एक धडा घेतला की, जे काही थोडेथोडके काम असेल ते बरे किंवा चांगले नाही, तर नेहमी उत्तमच करायचे! जेणेकरुन ते पुन्हा बदलावे लागणार नाही. अशाप्रकारे सत्याचे व अहिंसेचे कठोरपणे पालन करुन आजच्या मुलांसाठी तुम्ही मोलाचा आदर्श उभा केलात.

ज्याप्रमाणे तुम्ही सत्य व अहिंसेचे महत्त्व पटवून दिलेत, त्याप्रमाणे स्वदेशी वस्तूंचा प्रचार-प्रसार केलात. त्यात याची सुरुवात तुम्ही स्वतःपासून केलीत, देशभक्तीसाठी केवळ पंचा नेसून तुम्ही सर्वत्र उपदेश दिलात. यातूनच तुमची 'साधी राहणी व उच्च विचारसरणी' दिसून येते. आफ्रिकेतून परतल्यावर भारतातील गोरगरिबांची परिस्थिती पाहून तुम्ही स्वतः हाती चरखा घेतलात. यातून तुमची श्रम-प्रतिष्ठा दिसून येते.

देश, संस्कृती, सामान्य जनता यांच्या हिताचा विचार तुम्ही सर्वप्रथम केलात. चळवळींसाठी अहिंसेचा मार्ग स्वीकारुन आजच्या राजकारणी लोकांसाठीही नवा आदर्श निर्माण केला आहेत! निःशस्त्र परंतु शस्त्राएवढी ताकद असणाऱ्या तुमच्या देशभक्तीमुळे सरकारला नवे आव्हान तुम्ही केलेत.